# SOCIAL SECURITY CODE 2020

# DRAFT RULES (Central)

# सामाजिक सुरक्षा संहिता २०२०

# ( केंद्रीय ) मसुद्यातील नियम, त्यातील आव्हाने आणि प्रस्तावित सुधारणा

अनुक्रमणिका

१. प्रास्ताविक ........................................ १

२. सामाजिक सुरक्षा संरक्षणाचे उद्दिष्ट आणि संविधानिक वचनबद्धता ........................................ ४

३. संहितेच्या मर्यादा, उपयोजन (वापर) आणि प्रारंभ ........................................ ५

४. प्रमुख व्याख्या ........................................ ६

५. संहितेच्या अंमलबजावणीच्या उद्दिष्टांसाठी प्राधिकरणे ........................................ १०

६. असंघटित कामगार गिग (स्वतंत्र कंत्राटी) कामगार (ऑनलाईन ) प्लॅटफॉर्म कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारांचे विशेष अधिकार (कलम १०९ (१) (२) आणि कलम ११४) ...... .१२

७ असंघटित कामगार गिग (स्वतंत्र कंत्राटी ) कामगार आणि (ऑनलाईन) प्लॅटफॉर्म कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना ........................................ ...... .१२

८. असंघटित कामगार गिग (स्वतंत्र कंत्राटी ) कामगार आणि (ऑनलाईन) प्लॅटफॉर्म कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा निधीची स्थापना (कलम १४१)........................................ .१६

९. लाभार्थी सदरात असंघटित कामगार, गिग (स्वतंत्र कंत्राटी) कामगार, (ऑनलाईन) प्लॅटफॉर्म कामगारांची नोंदणी (कलम ११३) ........................................१७

१०. इमारत बांधकाम आणि इतर बांधकाम कामगारांसाठी कल्याण योजना (कलम७ (६))........................................१८

११ इमारत बांधकाम आणि इतर बांधकाम कामगारांसाठी कल्याण निधीच्या तरतूदी. ........................................१८

१२. लाभार्थी सदरात इमारत आणि इतर बांधकाम कामगारांची नोंदणी. ........................................१९

१३. महासाथी आणि अन्य साथींच्या आजारांच्या स्थिती दरम्यान अनिवार्य सामाजिक सुरक्षा ........................................ २०

१४. निधी आणि संबंधित खात्यांची देखभाल ........................................२०

१५. मसुद्यातील नियमांसमोरील आव्हाने ........................................२०

१६. प्रस्तावित (दुरुस्त्या) सुधारणा ........................................२२

१७. नॅशनल अलायन्स फॉर सोशल सिक्युरिटी (NASS ) आणि त्याच्या सदस्य संस्थांविषयी ........................................२४

१८. नॅशनल अलायन्स फॉर सोशल सिक्युरिटी (NASS ) आणि त्याचे पूर्वीचे कार्य ........................................२८

भारतात लाखो असंघटित कामगार आहेत. त्यांना सामाजिक सुरक्षेच्या लाभांचे संरक्षण मिळावे, त्या संरक्षणाची पातळी निश्चित व सुरक्षित असावी, या हेतूने कामगारांसाठी कार्यरत असलेल्या विविध संघटनांच्या नेतृत्वाने अनेक शतके संघर्ष केल्याचा इतिहास आहे. या संघटनांमध्ये मुख्यत्वे स्वयं रोजगारांची महिला संघटना ( सेल्फ एम्प्लॉईड वूमेन्स असोसिएशन SEWA ), श्रमिकांसाठीचे राष्ट्रीय केंद्र (NCL), तामिळनाडू बांधकाम कामगार युनियन, आंध्रप्रदेश कृषी कामगार युनियन, तामिळनाडू कृषी कामगार युनियन, कर्नाटक बांधकाम कामगार युनियन, केंद्रीय विधेयकांसाठी (कायद्यांसाठी ) राष्ट्रीय प्रचार प्रसार समिती (NCCCL) याखेरीज महाराष्ट्र, राजस्थान, गुजराथ, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, ओडिशा आणि उत्तर प्रदेशच्या विविध भागांमध्ये असंघटित कामगारांचे विविध उपक्रम राबवण्यासह कार्यरत असलेल्या, विविध संघटनांच्या चळवळींचा इतिहास तब्बल चार दशकांचा आहे. मजबूत दृष्टिकोन आणि प्रेरणांचा निर्धार यासह आजही या चळवळी अतिशय जागृतावस्थेत आहेत. अखंड चालणाऱ्या संघर्षाचीच ही प्रक्रिया आहे. देशातल्या असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणारा कायदा तयार व्हावा, यासाठी दुसऱ्या राष्ट्रीय कामगार आयोगाने २००२ साली एक उपगट स्थापन केला त्याचे अभिमानास्पद सदयस्यत्व मिळवण्यात, स्वयं रोजगारांची महिला संघटना (SEWA ) ने अतिशय महत्वाची भूमिका बजावली, हे प्रयत्न या मालिकेतले ठळक वैशिष्ट्यच आहे.

समान विचारधारा असलेली राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संघटना ( NASS ), या साऱ्या संघटनांची एक सामूहिक शक्ती बनली. योग्यवेळी साऱ्या संघटना एकत्र आल्या. याच उद्दिष्टांसाठी एक दशकापासून त्या लढत आहेत, ही महत्वाची माहिती या संदर्भात इथे नमूद केली पाहिजे. राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संघटना ( NASS ) म्हणजे स्वयं रोजगार महिला संघटना (सेल्फ एम्प्लॉईड वूमेन्स असोसिएशन SEWA), होम नेट साऊथ एशिया (HNSA), सामाजिक जागरूकता आणि स्वयंसेवी शिक्षण (SAVE) बिल्डिंग अँड वूड वर्कर्स इंटरनॅशनल ( BWI), नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडिया, (NASVI) आंध्रप्रदेश व्यवसाय वृथीदारूला युनियन, तेलंगणा व्यवसाय वृथीदारूला युनियन, (APVVU आणि TVVU) या संस्था व संघटनांचा महासंघ आहे.

सर्व सामाजिक सुरक्षा कायद्यांना एकाच संहितेत बांधण्याच्या हेतूने, संसदेने २०१७ साली प्रयत्न सुरु केला. सामाजिक सुरक्षा संहिता २०२० हा त्याच प्रयत्नांचा परिपाक आहे. २०२० सालच्या या संहितेचे सध्याचे घटक हे केंद्र सरकारच्या प्रारंभिक संशोधनांच्या परिणामातून प्राप्त झालेले घटक आहेत. थोडक्यात नमूद करायचे झाले तर सामाजिक सुरक्षा संहिता २०२० च्या प्रयत्नांसाठी, संघटित आणि असंघटित अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांना लागू असलेले विद्यमान केंद्रीय सामाजिक सुरक्षा कायदे एकत्र जोडण्यात आलेले आहेत.

देशातल्या प्रमुख कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीचा इतिहास प्रत्यक्ष पाहिला तर मजबूत कामगार चळवळींच्या प्रयत्नांची पार्श्वभूमी त्यामागे होती. उच्चाधिकार आयोग आणि विविध समित्यांचे निष्कर्ष व त्यांच्या शिफारशींचे त्यात कटाक्षाने पालन केले जात होते. दुर्दैवाने सामाजिक सुरक्षा संहिता २०२० च्या वर्तमान कायद्यात अशा पार्श्वभूमीची पूर्णतः कमतरता दिसते आहे. तमाम कामगार संघटनांसाठी त्याचे दुष्परिणाम अयोग्य ठरणार आहेत. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे विविध राज्यांमध्ये कामगारांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जातात. सामाजिक सुरक्षेच्या संरक्षण लाभांची त्याद्वारे प्रभावी अंमलबजावणी होत असते. उदाहरणार्थ महाराष्ट्राचा हमाल, माथाडी आणि अंगमेहनत करणाऱ्या अन्य कामगारांसाठी (रोजगार आणि कल्याण नियमन) कायदा १९६९, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (रोजगार आणि कल्याण नियमन) कायदा १९८४, केरळ कृषी कामगार कायदा १९७४, केरळ हेड लोड कामगार कायदा १९७८, तामिळनाडू मॅन्युअल कामगार ( कामाचे नियमन आणि अटी (शर्ती) ) कायदा २००३, इत्यादी कायद्यान्वये कामगार वर्गाचे जे हितरक्षण केले जाते, त्याबाबत अथवा त्याला अनुसरून सामाजिक सुरक्षा २०२० संहितेत कोणताही उल्लेख आढळत नाही.

सामाजिक सुरक्षा संहिता २०२० या नव्या व्यवस्थेनुसार सुरु होऊ घातलेली कार्यवाही आणि उपक्रम म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आज अस्तित्वात असलेल्या ९ विद्यमान सामाजिक सुरक्षा कायद्यांचे काहीसे एकत्रिकरण आणि त्यातल्या बहुतांश तरतूदी रद्द करण्याची प्रक्रिया आहे. या ९ कायद्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. कर्मचारी भरपाई कायदा १९२३, कर्मचारी राज्य विमा कायदा १९४८, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदींचा कायदा १९५२, रोजगार विनिमय ( रिक्त पदांची अनिवार्य अधिसुचना) कायदा १९५९, मातृत्व लाभ कायदा १९६१, ग्रॅच्युइटी भरणा कायदा १९७२, सिने कामगार कल्याण निधी कायदा १९८१, इमारत बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर कायदा १९९६ आणि दुर्बल अथवा कमकुवत असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा २००८.

संहितेच्या या प्रक्रियेत आणखी एक खेदजनक बाब अशी की विविध क्षेत्रानुसार केंद्रीय पद्धतीने अमलात आणलेल्या कल्याण आणि सामाजिक सुरक्षेच्या विशिष्ट योजना आणि कायद्यांकडे नव्या संहितेने लक्ष घातलेले नाही. त्यात मुख्यत्वे मिका खाण कामगार कल्याण कायदा १९४६, गोदी (डॉक) कामगार (रोजगार नियमन) कायदा १९४८, वैयक्तिक इजा (आपत्कालिन तरतूदी) कायदा १९६२, वैयक्तिक जखम (भरपाई विमा) कायदा १९६३, चुनखडी आणि डोलोमाइट खाणी कामगार कल्याण निधी कायदा १९७२, लोह खनिज खाणी, मँगेनीज आणि क्रोमो ओर खाणी कामगार कल्याण उपकर कायदा १९७६, बिडी कामगार कल्याण उपकर कायदा १९७६, इत्यादी कायद्यांचा समावेश आहे.

सामाजिक सुरक्षा संहिता २०२० चे दीर्घ शीर्षक, अशा परस्परविरोधी स्थितीतही खालील गोष्टी प्रदान करते.

**"संघटित, असंघटित अथवा अन्य कोणत्याही क्षेत्रातील सर्व कर्मचाऱ्यांना आणि कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या ध्येयाने सामाजिक सुरक्षिततेशी संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा आणि त्यांचे एकत्रिकरण करण्याचा कायदा"**

सामाजिक सुरक्षा संहिता २०२० ची व्याप्ती खऱ्या अर्थाने विचारात घेतली तर सरकारसाठी केवळ एक अशक्य कार्य म्हणूनच या शीर्षकाच्या औचित्याकडे पाहिले जाते.

## २ : सामाजिक सुरक्षा संरक्षणाचे उद्दिष्ट आणि संविधानिक वचनबद्धता

कल्याणकारी राज्याच्या रचनेत सामाजिक सुरक्षा हा महत्वाचा आधारस्तंभ आहे. देशातल्या तमाम कर्मचाऱ्यांसाठी उत्तमप्रकारे योजलेली सुरक्षा योजना अस्तित्वात असली तर अर्थकारणाबरोबर औद्योगिकरणाचाही वेगाने विस्तार होतो. सामाजिक सुरक्षेच्या विविध प्रयोगांद्वारेच प्रत्येक राज्य आपल्या नागरिकांना विशिष्ट अथवा प्रगतिशील जीवनमानावर ठेवण्याचा कायम प्रयत्न करीत असते. त्यात कोणतीही अधोगती घडावी, अशी इच्छा अथवा अनुमती कोणालाही नसते. बहुसंख्य कामगारांना अनेकदा विशिष्ट जोखमींना सामोरे जावे लागते. अशा जोखमींसाठी राज्य सरकार कामगारांना सुरक्षितता प्रदान करीत असते. या जोखमींमध्ये आकस्मितता अवश्य आहे. तथापि अल्पउत्पन्न असलेला कामगार दूरदृष्टीने अथवा स्वतःच्या क्षमतेने अशा संकटांना प्रभावीपणे सामोरा जाऊ शकत नाही. उद्भवलेल्या आपत्तीमुळे जर अचानक एखाद्याचे उत्पन्न घटले अथवा त्यापासून त्याला वंचित राहावे लागले तर त्याने नेमके काय करावे ? याची चिंता बहुदा कमीच होते. कामगार नोकरीवर कार्यरत असतो तेव्हा सामाजिक सुरक्षेच्या संकल्पनेकडे मूलतः त्याची बचत म्हणून पहिले जाते. कोणत्याही कारणास्तव जर त्याच्यावर बेरोजगारीची पाळी आली तर या योजनेतून त्याला मिळालेल्या रकमेचे उत्पन्न आधार देते.

भारताच्या राज्यघटनेत ‘सामाजिक आर्थिक समानता' आणि 'सामाजिक न्याय' या संकल्पांच्या पूर्तीसाठी, लाखो असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षा संरक्षणाच्या लाभांची किमान पातळी निश्चित करणे, हे महत्वाचे ध्येय आहे. राज्यघटनेच्या या मुलभूत ध्येयापासून, देशातील लाखो असंघटित कामगार सात दशकाहून अधिक काळ वंचित राहिले आहेत. हा असमान न्याय यापुढे दीर्घकाळ सहन करणे अथवा त्याची प्रतीक्षा करणे त्यांना जमणार नाही. अनेक दशकांपासून होणार हा अन्याय या पुढील सरकारांकडून त्यांना अपेक्षितही नाही. सामाजिक सुरक्षा संरक्षणाच्या हमीची मागणी केवळ 'कायदेशीर अधिकाराच्या' स्वरूपात नव्हे तर ‘घटनात्मक अधिकाराच्या ' स्वरूपात कामगारांनी केली पाहिजे.

घटनेच्या अनुच्छेद २१ नुसार 'सामाजिक सुरक्षेच्या संरक्षणाचा अधिकार' हा 'जगण्याच्या हक्काचा' अविभाज्य भाग आहे. अनुच्छेद २१ च्या व्याप्तीनुसार या अधिकारासाठी 'मूलभूत अधिकार' म्हणजेच 'जीवन जगण्याचा

अधिकार' म्हणून पहिले जायला हवे. घटनेत नमूद असलेल्या या सामाजिक आर्थिक अधिकाराच्या प्राप्तीसाठी संघटनांची 'सामुदायिक शक्ती' म्हणून आम्ही आवाज उठवतो.

सामाजिक सुरक्षा लाभांच्या संरक्षणाची केवळ कामगारांनाच नव्हे तर सर्वांनाच ( चांगल्या प्रकारे स्पष्ट केलेल्या तरतुदींसह) अपेक्षा आहे. या संदर्भात सरकारचा दृष्टिकोन विधायक असणे गरजेचे आहे. संहितेच्या अंमलबजावणीत तो सुस्पष्ट उद्देशांसह निश्चित असायला हवा.

# ३. संहितेच्या मर्यादा, उपयोजन ( वापर ) आणि प्रारंभ

सामाजिक सुरक्षा संहिता २०२० कलम १ (२) नुसार प्रस्तुत कायद्याचा संपूर्ण भारतात विस्तार आहे.

संहितेच्या कलम १ (३) नुसार, केंद्र सरकारच्या राजपत्रातील अधिसुचनेच्या अधिकृत तारखेनुसार, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० लागू होईल. संहितेच्या भिन्न तरतुदींसाठी भिन्न तारखा नियुक्त केल्या जाऊ शकतात. संहितेच्या प्रारंभाला कोणत्याही तरतूदीतला कोणताही संदर्भ ती तरतूद अमलात येण्याच्या संदर्भातच आहे, असे मानले जाईल.

संहिते अंतर्गत येणारी राज्ये त्याच्या अंमलबजावणीतल्या एजंसीचाच भाग आहेत. तथापि राज्यांच्या क्षेत्रात संहिता सुरु केल्याबद्दल कोणताही उल्लेख या विभागात केलेला नाही. हा पैलू संहितेअंतर्गत योग्य नियम बनवण्याच्या राज्यांच्या भूमिकेबाबत विशिष्ट संदर्भाचा उल्लेख करणारा आहे.

**सूचना : संहितेच्या अंमलबजावणीत योग्य नियमांची रचना व्हावी, कामगार चळवळीत कार्यरत संघटनांची भूमिकाही त्यात असावी, या हेतूने राज्य सरकारांनी त्यांचा कटाक्षाने समावेश करणे आवश्यक आहे.**

# ४. प्रमुख व्याख्या

**संहितेच्या प्रमुख व्याख्यांमध्ये खालील व्याख्यांचा समावेश आहे.**

- i) बांधकाम कामगार (कलम २(७) )
- ii ) गिग (स्वतंत्र कंत्राटी) कामगार, (कलम २(३५) )
- iii ) घरगुती कामगार (कलम २(३६) )
- iv ) प्लॅटफॉर्म काम (कलम २(६०) )
- v ) प्लॅटफॉर्म कामगार (कलम २(६१) )

**vi ) स्वयं रोजगारातील कामगार, (कलम २(७५) )**

**vii ) सामाजिक सुरक्षा (कलम २(७८) )**

**viii) असंघटित क्षेत्र (कलम २(८५) )**

**ix ) असंघटित कामगार (कलम २(८६) )**

**x ) वेतन कामगार (कलम २(९०) )**

**प्रस्तुत संहिता, कामगारांसाठी स्पष्ट केलेले सामाजिक सुरक्षा लाभ, अन्य गोष्टींसह प्रदान करते.**

**i) इमारत व बांधकाम कामगार**

**ii ) असंघटित कामगार**

**iii ) गिग (स्वतंत्र कंत्राटी) कामगार,**

**iv ) प्लॅटफॉर्म कामगार**

कामगारांच्या या चार श्रेणींमधे कामगारांचे तीन प्रकार i) इमारत व बांधकाम कामगार ii )गिग (स्वतंत्र कंत्राटी) कामगार, iii ) प्लॅटफॉर्म कामगारांचे क्षेत्र विशिष्ट श्रेणी अंतर्गत येते. असंघटित कामगार हा शब्दप्रकार मात्र विशिष्ट श्रेणी अथवा विशिष्ट श्रेणी व्यतिरिक्त व्यापक श्रेणीमधे येतो.

'असंघटित कामगार' म्हणजे कोण? संहितेच्या कलम २(८६) च्या व्याख्येनुसार 'असंघटित कामगार' म्हणजे 'घरगुती कामगार, स्वयंरोजगारातील कामगार, असंघटित क्षेत्रातील वेतन कामगार, याखेरीज औद्योगिक विवाद कायदा, १९४७' अथवा जे प्रस्तुत संहितेतील अध्याय क्रमांक III ते VII च्या अंतर्गत येत नाहीत अशा 'संघटित क्षेत्रातील कामगारांचा समावेश होतो.

कलम २ (८५) अंतर्गत **'असंघटित क्षेत्र'** म्हणजे व्यक्ती अथवा स्वयंरोजगारात कामगारांच्या मालकीची, वस्तूंचे उत्पादन, विक्री अथवा कोणत्याही प्रकारची सेवा प्रदान करण्यात गुंतलेली एंटरप्राइज असते. अशा संस्थेने कामावर ठेवलेल्या, **कामगारांची संख्या दहापेक्षा कमी असते'.**

सदर व्याख्येनुसार ११ ते १९ कामगारांना रोजगार देणारा आणि वीजेच्या सहाय्याशिवाय चालवला जाणारा उपक्रम हा 'असंघटित क्षेत्र' अथवा ' कारखाना ' नसतो. संहिते अंतर्गत **(कलम २ (३२) नुसार 'कारखाना' ची व्याख्या** पहा).

**संहितेत 'एंटरप्राइज' शब्दाची व्याख्या केलेली नाही.**

**'वेतन कामगार'** म्हणजे कलम २ (९०) नुसार केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी अधिसूचित केलेल्या रकमेच्या मासिक वेतनासह, असंघटित क्षेत्रातल्या मोबदल्यासाठी, (थेट नियोक्ता अथवा कोणत्याही कंत्राटदाराद्वारे, कामाची जागा विचारात न घेता), केवळ एक नियोक्ता अथवा एकापेक्षा अधिक नियोक्त्यांसाठी, रोखीत अथवा वस्तू रूपात, घरगुती कामगार, तात्पुरते किंवा आकस्मिक कामगार, अथवा

स्थलांतरित कामगार म्हणून, अथवा घरातून काम करणाऱ्या कामगारांसह घरांद्वारे कामावर ठेवलेले कामगार म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती 'वेतन कामगार' श्रेणीत येते. सदर व्याख्येत दहा पेक्षा अधिक नसलेल्या तसेच कृषी कार्यांसह वृक्षारोपणात काम करणाऱ्या कामगारांचाही समावेश होतो. **नियोक्त्याने नियुक्त केलेल्या 'कृषी कामगारांची ' संख्या जर १० पेक्षा अधिक असेल तर प्रस्तुत संहिता लागू होणार नाही.**

'गिग कामगार' संकल्पनेची व्याख्या कलम २ (३५) नुसार पुढीलप्रमाणे आहे. जी व्यक्ती काम करते अथवा कामाच्या व्यवस्थेत भाग घेते, पारंपारिक नियोक्ता-कर्मचारी संबंधांव्यतिरिक्त अशा कामकाजातून पैसा कमावते. अशी व्यक्ती म्हणजे 'गिग कामगार'

**(प्रस्तुत संहितेने 'गिग कामाची' व्याख्या मात्र केलेली नाही तथापि कंत्राटी कामगारांना 'गिग कामगार' असेही संबोधले जाते.)**

'प्लॅटफॉर्म कामगार' संकल्पनेची व्याख्या संहितेच्या कलम २ (६१) नुसार पुढीलप्रमाणे आहे. प्लॅटफॉर्म कामात अथवा हाती घेतलेल्या कामात व्यस्त असलेले लोक असा याचा अर्थ आहे .

'प्लॅटफॉर्म काम' म्हणजे कलम 2 (60) नुसार नियोक्ता-कर्मचारी नातेसंबंधाच्या बाहेर एक कार्य व्यवस्था असते, ज्यामध्ये विशिष्ट समस्या सोडवण्यासाठी अथवा विशिष्ट सेवा प्रदान करण्यासाठी संस्था व व्यक्ती एकत्र येतात. संस्था किंवा व्यक्ती नियोजित कामकाजात प्रवेश करण्यासाठी ऑनलाइन व्यासपीठाचा वापर करतात. या कामाच्या मोबदल्यात अशा व्यक्ती अथवा संस्थांना मानधन / वेतन दिले जाते. केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या विशिष्ट सेवा किंवा इतर कोणतीही कामे 'प्लॅटफॉर्म काम' या सदरात मोडतात.

'प्लॅटफॉर्मचे काम' करारांच्या आधारे, कुशल अथवा विशेष काम' या श्रेणीत येते. त्यात होणारी कमाई 'शोषित' कामगारांसारखी नव्हे तर बऱ्यापैकी चांगली अथवा उच्च दर्जाची असते.

**"सामाजिक सुरक्षितता' संकल्पनेची व्याख्या कलम २ (७८) नुसार पुढीलप्रमाणे आहे. सामाजिक सुरक्षा संरक्षणाचे उपाय असा त्याचा अर्थ आहे.**

(i) कर्मचारी

(ii) असंघटित कामगार

(iii) टमटम कामगार आणि

(iv) प्लॅटफॉर्म कामगार

यांचा आरोग्य सेवेत प्रवेश सुनिश्चित करणे, उत्पन्नाची सुरक्षा प्रदान करणे, विशेषत: त्यांचे वृद्धत्व, बेरोजगारी, आजारपण, कामकाजातली अवैधता, कामात झालेली दुखापत, मातृत्व किंवा कमावत्या

व्यक्तीचे नुकसान झाले असल्यास, या संहितेनुसार त्यांना काही विशेष लाभाचे अधिकार आणि तयार केलेल्या योजनांद्वारे नुकसान भरपाई मिळू शकते. .

**सूचना : या व्याख्येनुसार इमारत बांधकाम आणि इतर बांधकाम कामगारांना 'कल्याणकारी' फायदे दिले गेल्यामुळे 'सामाजिक सुरक्षे' च्या संरक्षणातून त्यांना वगळण्यात आले आहे, कारण 'सामाजिक सुरक्षा' संकल्पनेपेक्षा ते अधिक व्यापक आहे.**

**"कल्याण" ही संज्ञा आहे. "सामाजिक सुरक्षा" संकल्पना त्याच्या प्रवर्गातील पोटप्रकारांपैकी एक आहे.**

# ५. संहितेच्या अंमलबजावणीच्या उद्देशांसाठी प्राधिकरणे

| अनु. क्र. | तपशील | असंघटित कामगारांसाठी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ (कलम ६ (२-७)गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी राष्ट्रीय SS बोर्ड-कलम ११४(६) | असंघटित कामगारांसाठी राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ (कलम६. (९-१५) | राज्य इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ (कलम ७ (१-६) |
|---|---|---|---|---|
| १ | **संहितेनुसार रचना करण्याचा अधिकार** | कलम ६ अंतर्गत केंद्र सरकार | कलम ६(९) अंतर्गत राज्य सरकार | कलम ७ अंतर्गत राज्य सरकार |
| २ | **रचनेचे स्वरूप** | बहुपक्षीय (कलम ६ (२)) | बहुपक्षीय (कलम६ (१०)) | राज्याने तयार केलेल्या संबंधित नियमांनुसार उल्लेख (निर्दिष्ट) करणे आवश्यक आहे. कलम ७ (३) नुसार (पूर्वी पासून अस्तित्वात असलेल्या बहुतेक राज्यांमध्ये) पहा |
| ३ | **अधिकार आणि कार्ये** | (i) असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांच्या विविध विभागांसाठी योग्य योजना | (i) असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या विविध | मृत्यू आणि अपंगत्वाचे आर्थिक लाभ प्रदान करणे; लाभार्थ्यांना ६० वर्षांनंतर पेन्शन अदा करणे, लाभार्थ्यांसाठी गट विमा योजनेचा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | तयार करणे, त्यासाठी केंद्र सरकारला शिफारस करणे<br>(ii) केंद्र सरकारतर्फे राबवल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांचे निरीक्षण करणे आणि<br>(iii) राज्य स्तरावरील नोंदींच्या कार्यांचा आढावा घेणे | विभागांसाठी योग्य योजना तयार करणे, त्यासाठी राज्य सरकारला शिफारस करणे;<br>(ii) राज्य सरकारतर्फे असंघटित कामगारांसाठी तसेच अशा वर्गासाठी राबवल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांचे निरीक्षण करणे; आणि<br>(iii) असंघटित कामगारांची नोंदणी तसेच कार्ड वितरण करण्याच्या प्रगतीचा आढावा घेणे. | हप्ता (प्रीमियम) भरणे, लाभार्थ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक योजना तयार करणे,<br>लाभार्थी व त्यांच्या आश्रितांच्या प्रमुख आजारांसाठी वैद्यकीय खर्च पुरवणे,<br>लाभार्थ्यांना मातृत्वाचे कायदेशीर लाभ प्रदान करणे,<br>कौशल्य विकास योजना पुरवणे, पारगमन निवास व्यवस्था पुरवणे,<br>कल्याणकारी उपायांची तरतूद आणि त्यांमध्ये सुधारणा करणे. |

## ६. असंघटित कामगार, गिग वर्कर्स आणि प्लॅटफॉर्म कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणारे केंद्र आणि राज्य सरकारचे विशेषाधिकार (कलम १०९ (१) (२) आणि कलम ११४)

असंघटित कामगार, गिग वर्कर्स आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी विशेष योजना तयार करता याव्यात, यासाठी प्रस्तुत संहिता सुयोग्य शासन, म्हणजेच केंद्र आणि राज्य शासनाला विशेषाधिकार प्रदान करते. हा

विशेषाधिकार असंघटित कामगारांसाठी राष्ट्रीय आणि राज्य सामाजिक सुरक्षा बोर्डासारख्या सामाजिक सुरक्षा प्राधिकरणांकडून करण्यात येणाऱ्या कोणत्याही शिफारसींशिवाय आहे.

**राष्ट्रीय आणि राज्य सामाजिक सुरक्षा मंडळांनी कलम ६ नुसार केलेल्या सामाजिक सुरक्षा योजनांच्या शिफारसींना, तसेच केंद्र आणि राज्य सरकारांतर्फे तयार झालेल्या सामाजिक सुरक्षा योजनांना पूरक म्हणून पाहिले गेले पाहिजे. या पैलूकडे दुर्लक्ष केले जाऊ नये.**

## ७. असंघटित कामगार, गिग (कंत्राटी) कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना

| अनु. क्र. | योजना तयार करण्याचा अधिकार आणि योजनेचे कार्यक्षेत्र | असंघटित कामगारांसाठी योजना | गिग (कंत्राटी) कामगारांसाठी योजना | प्लॅटफॉर्म कामगारांसाठी योजना |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्र सरकार (कलम १०९ (१) | (a ) जीवन आणि अपंगत्व संरक्षण;<br>(b ) आरोग्य आणि मातृत्वाचे कायदेशीर लाभ<br>(c ) वृद्धत्व (म्हातारपण) संरक्षण<br>(d ) शिक्षण; आणि<br>(e ) केंद्र सरकारने ठरवलेले इतर कोणतेही लाभ | (a) जीवन आणि अपंगत्व संरक्षण;<br>(b) अपघात विमा<br>(c) आरोग्य आणि मातृत्वाचे कायदेशीर लाभ<br>(d) वृद्धत्व (म्हातारपण) संरक्षण<br>(e) संगोपन केंद्र आणि<br>(f) केंद्र सरकारने ठरवलेले इतर कोणतेही लाभ | (a) जीवन आणि अपंगत्व संरक्षण;<br>(b) अपघात विमा;<br>(c) आरोग्य आणि मातृत्वाचे कायदेशीर लाभ<br>(d) वृद्धत्व (म्हातारपण) संरक्षण<br>(e) संगोपन केंद्र; आणि<br>(f) केंद्र सरकारने ठरवलेले इतर कोणतेही लाभ |
| २ | योजनेची व्याप्ती | **योजनांनी या गोष्टी पुरवाव्यात**<br>योजनेचे कार्यक्षेत्र<br>योजना राबवण्याचा अधिकार | **तयार योजना खालील गोष्टी पुरवतात**<br>योजना राबवण्याची पध्दत<br>योजना लागू करणारी | **तयार योजना या गोष्टी प्रदान करतात:**<br>योजना राबवण्याची पध्दत<br>योजना लागू करणारी एजन्सी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | योजनेचे लाभार्थी;<br>**योजनेचे स्त्रोत**<br>योजना लागू करण्यासाठी एजन्सी<br>तक्रारींचे निवारण आणिइतर कोणत्याही संबंधित बाबी | एजन्सी<br>योजनेमध्ये समूहकांची भूमिका आणि<br>**योजनांच्या निधीचे स्त्रोत** | योजनांमधे समूहकांची भूमिका आणि<br>**योजनांच्या निधीचे स्त्रोत** |
| ३ | **योजनांच्या निधीचे स्त्रोत कलम १०९ (३) इथे कलम १४१ चा संदर्भ देणेही आवश्यक आहे.** | (a) केंद्र सरकारकडून पूर्ण निधी दिला जातो; अथवा<br>(b) केंद्र सरकारकडून अंशतः आणि राज्य सरकारकडून अंशतः निधी दिला जातो; किंवा<br>(c) केंद्र सरकारकडून अंशतः राज्य सरकारकडून अंशतः निधी आणि योजनेतील लाभार्थींकडून अथवा योजनेत उल्लेखित नियोक्त्यांकडून अंशदानाने निधी दिला जातो, अथवा<br>(d) कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत कॉर्पोरेट सामाजिक दायित्वातर्फे अथवा योजनेत उल्लेखित अन्य कोणत्याही स्त्रोताकडून निधीकरण केले जाते. | (a) केंद्र सरकारकडून पूर्ण निधी दिला जातो; किंवा (b) केंद्र सरकारतर्फे अंशतः आणि राज्य सरकारकडून काही अंशी निधी दिला जातो;<br>(c) केंद्र सरकारकडून अंशतः व राज्य सरकारकडून अंशतः निधी आणि योजनेतील लाभार्थींकडून किंवा योजनेत उल्लेखित नियोक्त्यांकडून अंशदानाने निधी दिला जातो; अथवा<br>(d) कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत कॉर्पोरेट सामाजिक दायित्वातर्फे अथवा योजनेत उल्लेखित अन्य कोणत्याही स्त्रोताकडून निधीकरण केले जाते. | (a) केंद्र सरकारकडून पूर्ण निधी दिला जातो; अथवा<br>(b) केंद्र सरकारकडून अंशतः आणि राज्य सरकारकडून अंशतः निधी दिला जातो; अथवा<br>(c) केंद्र सरकारकडून अंशतः राज्य सरकारकडून अंशतः निधी आणि योजनेतील लाभार्थ्यांकडून किंवा योजनेत उल्लेखित नियोक्त्यांकडून अंशतः निधी अथवा<br>(d) कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत कॉर्पोरेट सामाजिक दायित्वातर्फे अथवा योजनेत उल्लेखित अन्य कोणत्याही स्त्रोताकडून निधीकरण केले जाते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | **राज्य सरकार (कलम १०९ (२)) केंद्र सरकारद्वारे उप कलम (१) अंतर्गत विशेष तयार केलेल्या योजनांमध्ये या योजना समाविष्ट आहेत.** | (a) भविष्य निर्वाह निधी;<br>(b) रोजगार दुखापत लाभ;<br>(c) गृहनिर्माण;<br>(d) मुलांसाठी शैक्षणिक योजना;<br>(e) कामगारांसाठी कौशल्य सुधारणा;<br>(f) अंत्यसंस्कार सहाय्य; आणि<br>(g) वृद्धाश्रम. | | |
| ५ | **राज्याने सुरू केलेल्या योजनांच्या निधीचे स्रोत** | (a) राज्य सरकारकडून पूर्ण निधी दिला जातो अथवा (b) राज्याद्वारे अंशतः आणि उल्लेखित केल्यानुसार अंशत: लाभार्थी अथवा नियोक्त्याने दिलेल्या अंशदानानुसार; अथवा (c) कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधीसह संदर्भ दिलेल्या स्त्रोताकडून निधीकरण; आणि (d) राज्य सरकार केंद्र सरकारकडून या संदर्भात आर्थिक मदत घेऊ शकते. | | |

**संहितेतील कलम १५० व्यतिरिक्त, सदर संहिता 'योग्य सरकार' ला विशिष्ठ अधिकार प्रदान करते - पूर्व प्रकाशना अधीन, संहितेच्या तरतुदींना योग्य परिणाम देण्यासाठी योजना तयार करा.**

## ८. असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा निधीची स्थापना (कलम १४१)

केंद्र सरकार कलम १४१(१) नुसार, असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांची सामाजिक सुरक्षा आणि कल्याणासाठी सामाजिक सुरक्षा निधीची स्थापना करते. अशा निधीमध्ये खालील स्रोतांचा समावेश असेल:

(a) कलम १०९ नुसार, प्राप्त / गठित निधी.

(b) कलम ११४ नुसार, प्राप्त / गठित निधी.

(c) संहितेतल्या संबंधित तरतुदींचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जातो.

राज्य सरकारे कलम १४१ (५) नुसार, असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी सामाजिक सुरक्षा निधीची स्थापना करतात. अशा निधीत खालील स्त्रोतांचा समावेश असेल

(a) संहितेतल्या संबंधित तरतुदींचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जातो; आणि

(b) राज्य सरकारने विहित केलेले इतर स्त्रोत.

## ९ असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांची लाभार्थी म्हणून नोंदणी (कलम ११३)

(i) असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांच्या नोंदणी - पात्रतेच्या अटी

(a) वयाची १६ वर्षे किंवा केंद्र सरकारने निर्देशित केलेले वय पूर्ण झालेले हवे;

(b) केंद्र सरकारने नमूद (निर्दिष्ट) केलेल्या माहितीसह स्वयं-घोषणा फॉर्म भरावा.

(ii) प्रत्येक पात्र असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगाराने, आपल्या आश्रितांच्या ओळखीसह स्वतःची ओळख प्रस्थापित करण्यासाठी, केंद्र सरकारने निर्धारित केलेल्या अर्जाचा फॉर्म, आधार कार्डची प्रत आणि इतर कागदपत्रे द्यावीत. (यासाठी संहितेचे कलम १४२ (१) पहावे)

(iii) केंद्र सरकारने नमूद व प्रदान केल्यानुसार इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेही कामगार स्वयं-नोंदणीकृत असतील

(iv) नोंदणीची औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर, नोंदणीकृत कामगाराला एक विशेष (अद्वितीय) क्रमांक दिला जाईल आणि नोंदणीकृत कामगार संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असेल.

## १०. इमारत आणि इतर बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना (कलम ७ (६))

**संहितेच्या तपशिलांमधे अधिक स्पष्टता यावी या उद्देशाने हा भाग पुनरुधृत केला आहे .**

**राज्य सरकार,संहितेतील कलम ७ नुसार, "इमारत कामगार आणि इतर बांधकाम कामगारांसाठी एक 'कल्याण मंडळ" स्थापन करील आणि सदर मंडळ खाली नमूद उपक्रम राबवण्याचे कार्य करील: -**

(1) मृत्यू आणि अपंगत्वाचे लाभ प्रदान करणे

(2) लाभार्थ्यांना ६० वर्षांनंतर पेन्शन देणे

(3) लाभार्थ्यांच्या गट विमा योजनेसाठी हप्ता (प्रीमियम) भरणे

(4) लाभार्थ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक योजना तयार करणे

(5) लाभार्थी आणि त्याचे आश्रित यांच्या प्रमुख आजारांसाठी वैद्यकीय खर्च अदा करणे;

(6) लाभार्थ्यांना मातृत्वाचे कायदेशीर लाभ मिळवून देणे;

(7) कामगारांसाठी कौशल्य विकास योजना लागू करणे.

(8) पारगमन निवासाची सोय प्रदान करणे; आणि

(9) कल्याणकारी उपायांच्या तरतूदीसह त्यात सुधारणा करणे.

## ११ इमारत बांधकाम आणि इतर बांधकाम कामगारांसाठी कल्याण निधीची घटना

संहितेतील कलम १०० प्रमाणे, केंद्र सरकारने निर्देशित केल्यानुसार नियोक्त्याला (जमिनीची किंमत वगळता) आलेल्या खर्चाच्या २ % दराने उपकर लावून बांधकाम कामगार अथवा कर्मचाऱ्याला त्याच्या रोजगाराच्या दरम्यान अथवा त्या कालावधी दरम्यान झालेल्या दुखापतीसाठी प्रदान केलेली भरपाई तसेच इतर बांधकाम कामगारांसाठी 'सामाजिक सुरक्षा आणि कल्याण निधीची' निर्मिती करण्याची तरतूद आहे.
केंद्र सरकारने विहित केलेल्या पद्धतीने, संबंधित स्थानिक प्राधिकरणाने अशा बांधकामांना मंजुरी देण्यापूर्वी असा उपकर लावणे आणि इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे तो जमा करणे आवश्यक आहे. कलम १०८ (२) नुसार अशा जमा निधीला "इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण निधी" असे म्हटले जाईल. संहितेच्या कलम ७ (६) नुसार सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांच्या तरतुदीसाठी पुरेसा खर्च पूर्ण करण्यासाठी अर्ज केला जाईल.

**संहितेतील कलम १०६ च्या तरतूदीनुसार प्रत्येक बांधकाम कामगार, ज्याने वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत पण ६० वर्षे पूर्ण केलेली नाहीत, तसेच कॅलेन्डर वर्षाआधी ज्याने किमान ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले आहे, अशा कामगारांची, संबंधित प्राधिकरणाने संहितेनुसार लाभार्थी म्हणून नोंदणी करावी.**

बांधकाम संहितेच्या कलम १०७ नुसार लाभार्थीच्या लाभांची समाप्ती

(a) जर कामगाराने वर्षात किमान ९० दिवस काम केले नसेल; किंवा

(b) जर कामगाराचे वय ६० वर्षे पूर्ण झाले असेल.

## १३. महासाथी आणि अन्य साथींच्या आजारांच्या स्थिती दरम्यान अनिवार्य सामाजिक सुरक्षा

आपला देश COVID-19 च्या महासाथीचा धोकादायक अवस्थेत सातत्याने सामना करीत आहे, या महासाथीने देशातील लाखो असंघटित कामगारांच्या जीवनावर आणि उपजीविकेवर विनाशकारी परिणाम निर्माण झाला आहे. नोकरी आणि उत्पन्नाचे नुकसान, श्रमिक सेनेचे विस्थापन, जीवितहानी, तीव्र गरीबी, उपासमार आणि असहायतेच्या परिस्थितीला लोकांना सामोरे जावे लागले आहे. ही 'महासाथ' आणि अन्य साथीच्या प्रादुर्भावाच्या दरम्यान, उपासमार, दारिद्र्य, जीवितहानी आणि असहायतेची स्थिती टाळता यावी, यासाठी संहितेत स्पष्ट केलेले 'सामाजिक सुरक्षा संरक्षण' सर्वांना आवश्यक आहे. संहितेने हे कर्तव्य राज्य सरकारांवर सोपवले आहे.

## १४ निधी आणि खात्यांची देखरेख

राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ (गिग आणि प्लॅटफॉर्म कामगार मंडळासह), राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ आणि राज्य इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाला २ (७९) कलमांतर्गत "सामाजिक सुरक्षा संघटना" संबोधले जाते.

**कलम ११५ (१) मधे नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक सामाजिक सुरक्षा संस्थेला आपले उत्पन्न आणि खर्चाचे योग्य हिशेब ठेवावे लागतील.** .

## १५. आगामी आव्हाने

(i) केंद्र सरकारद्वारे जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे, पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे कलम १ (३) नुसार प्रस्तुत संहितेच्या अंमलबजावणीचे ठोस मार्गक्रमण प्राप्त करणे. चळवळीचा सर्वात महत्वाचा पैलू म्हणून याकडे पाहिले पाहिजे.

(ii) संहितेच्या अंमलबजावणीचे इतर पैलू त्यामुळे सुलभ होतील. केंद्र सरकारकडून असंघटित कामगार, गिग वर्कर्स आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी योग्य सामाजिक सुरक्षा योजना तयार करणे, हा महत्वाचा ऊद्देश आहे.

(iii) संहितेतील तरतुदींनी सांगितलेल्या योजना, अनौपचारिक कामगारांच्या तीन श्रेणींना, सामाजिक सुरक्षेचे लाभ व संरक्षण पुरवण्यासाठी तसेच अधिसूचित योजनांचे व्यवस्थापन करण्यासाठी 'निधी' तयार करण्याची पद्धत प्रदान करतात.

(iv) केंद्र सरकारच्या वतीने यासंदर्भात कोणतीही चूक किंवा ढिलाई झाली तर ते ‘भेदभावपूर्ण' पाऊल ठरेल. कारण अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांच्या दोन श्रेणींना, म्हणजे (i) इमारत आणि इतर बांधकाम कामगार व (ii) असंघटित कामगारांच्या इतर श्रेणींना प्रस्तुत संहिता 'असमान' किंवा 'वेगळ्या प्रकारची ' वागणूक देते त्यामुळे राज्य घटनेच्या अनुच्छेद १४ च्या ‘समानता' तत्वाचे उल्लंघन होते अथवा ते भंग केले जाते. 'इमारत

आणि इतर बांधकाम कामगारांना, सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी ऊद्देशांसाठी ही संहिता एक विशेष' निधी 'व्यवस्था प्रदान करते.

(v) कामगार चळवळी समोर सध्याची आव्हाने म्हणजे सामाजिक सुरक्षा संहिता २०२० कायद्याद्वारे, 'समान' लोकांना ( इमारत आणि इतर बांधकाम कामगार तसेच असंघटित, गिग आणि प्लॅटफॉर्म कामगार) यांना एकप्रकारे 'असमान' वागणूक देण्याचा प्रयोग सुरु आहे. कायद्यातील अशा अपूर्णतेचा दुर्दैवी भाग दूर करण्यासाठी 'मेंडामस' प्राधिलेख ((Mandamus Writ) चा आदेश मिळवण्यासाठी, 'समिट न्यायालय' (सर्वोच्च न्यायालयाकडे) धाव घेण्यापर्यंतच्या प्रयत्नांनी कळस गाठला आहे.

(vi) प्रत्येक राज्य सरकार अधिसुचनेद्वारे एक 'राज्य मंडळ' स्थापन करील हा दुसरा टप्पा. "असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ" असे त्याला संबोधले जाईल, संहितेअंतर्गत त्याला दिलेली कार्ये ते पार पाडील. (कलम ६ (१))

(vii) राज्य सरकारने (सोप्या सरावासाठी) या संदर्भात योग्य नियम तयार करायला हवेत.

(viii) प्रत्येक राज्य सरकार अधिसूचनेद्वारे एक मंडळ स्थापन करेल. "इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ" असे त्याला संबोधले जाईल, हे मंडळ संहितेनुसार त्याला दिलेली कार्ये पार पाडेल. (कलम ७ (१))

(ix) राज्य सरकारांनी (सोप्या सरावासाठी)या संदर्भात योग्य ते नियम तयार केले पाहिजेत.

(xi) राज्य सरकारांद्वारे असंघटित कामगारांसाठी तयार करायच्या सामाजिक सुरक्षा योजना राबवण्यासाठी, ज्यायोगे संबंधित 'निधी' स्थापन केला जाईल, त्या पद्धतीची तरतूद करणे आवश्यक आहे.

## १६. प्रस्तावित दुरुस्त्या

(१) प्रस्तुत संहितेच्या वापराच्या मर्यादेत, राज्यांमध्ये ही संहिता सुरू करण्यासाठी, कलम १ (३) अंतर्गत 'राज्य शासनांचा' चा समावेश करणे;

(२) 'असंघटित क्षेत्र' या शब्दाला व्यापक अर्थ देण्यासाठी, कलम २ (८५) अंतर्गत 'एंटरप्राइझ' च्या व्याख्येचा समावेश करण्याची आवश्यकता आहे;

(३) 'असंघटित क्षेत्रात' नियुक्त केलेल्या किमान व्यक्तींच्या संख्येच्या आवश्यकतेचा सुरूवातीचा भाग, कलम २ (८५) मधून काढून टाकण्याची गरज आहे.

(४) संहितेच्या कलम २ (९०) अंतर्गत, 'वेतन कामगार' च्या व्याख्येत कोणत्याही परिस्थितीत 'कृषी कामगारांचा' समावेश करणे.

---

# १७. नॅशनल अलायंस फॉर सोशल सिक्युरिटी (NASS) आणि त्याच्या सदस्य संस्थांविषयी

**नॅशनल अलायंस फॉर सोशल सिक्युरिटी (NASS) :** अनौपचारिक क्षेत्र ( इन्फॉर्मल सेक्टर ) मधील कामगारांच्या सामाजिक सुरक्षा हक्कांवर भर देण्यासाठी, सामुदायिक मध्यस्थी निर्माण करण्यासाठी, २०१० साली राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा युती, उर्फ नॅशनल अलायंस फॉर सोशल सिक्युरिटी (NASS) ची स्थापना झाली. अनौपचारिक क्षेत्रातल्या कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी, आपल्या कार्याद्वारे योगदान देण्याचा ज्यांचा इतिहास आहे, अशा FNV आणि भारतातील त्याच्या सहयोगी संस्था, अनौपचारिक क्षेत्रातल्या कामगारांच्या सामाजिक सुरक्षेच्या न्याय्य हक्कांच्या मोहिमेसाठी एकत्र आल्या आहेत. भारतभरातील (सदस्यत्व आधारित) सात अनौपचारिक कामगार संघटनांची राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा ही युती आहे.

## या आहेत युतीच्या सदस्य संस्था:

**१. आंध्र प्रदेश व्यवसाय वृथीदारूला युनियन (APVVU) आणि तेलंगणा व्यवसाय वृथीदारूला युनियन (TVVU) :** भारतातल्या आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांच्या १८ जिल्ह्यांमधे विखुरलेले कृषी कामगार, अल्पभूधारक शेतकरी, मासेमारी करणारे स्थानिक लोक, मेंढपाळ आणि ग्रामीण भागातले कारागीर अशा विविध वर्गातल्या कष्टकऱ्यांच्या ५६२ मंडळ (ब्लॉक) स्तरावरील कामगार संघटनांचे राज्यस्तरीय महासंघ म्हणजे APVVU आणि TVVU आहेत.या सर्व संघटित मंडळ युनियनची सध्याची सभासद संख्या ६,९२,४०० आहे. युनियन १९९१ मध्ये अस्तित्वात आली आणि १९९८ साली राज्य स्तरावर त्याचा पूर्ण महासंघ स्थापन झाला आहे. **APVVU ची ५६ % सदस्य संख्या आणि त्यांचे नेतृत्वही महिलांकडेच आहे.**

**२. बिल्डिंग आणि वुड वर्कर्स इंटरनॅशनल (BWI) :** द बिल्डिंग अँड वुड वर्कर्स इंटरनॅशनल (BWI) ही संस्था इमारत, बांधकाम साहित्य, लाकूड, वनीकरण या क्षेत्रांशी संबंधित कामगार संघटनांची जागतिक स्तरावरील युनियन अथवा महासंघ आहे. या क्षेत्रातल्या जगभरातल्या कामगार संघटनांच्या विकासाला चालना देणे, कामगारांच्या हक्कांना प्रोत्साहन देणे, शाश्वत विकासाच्या उद्देशांची अंमलबजावणी करणे हे प्रमुख हेतू डोळयासमोर ठेवून या महासंघाची २००५ साली स्थापना झाली. BWI हा महासंघ, आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (ILO), एशियन डेव्हलपमेण्ट बँक ADB, वर्ल्ड बँक WB आणि युनाइटेड नेशन्स UN यांसह विविध आंतरराष्ट्रीय मंचांवर बांधकाम, बांधकाम साहित्य, लाकूड, वनीकरण आणि संबंधित क्षेत्रातील कामगार व कामगार संघटनांचे प्रतिनिधित्व करतो. इंटरनॅशनल ट्रेड युनियन कॉन्फेडरेशन, (ITUC) तसेच इतर जागतिक युनियन महासंघाची निकटवर्ती सहयोगी म्हणूनही ही संस्था काम करते. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक समितीत महासंघाला विशेष सल्लागाराचा दर्जा आहे.

**३. होम नेट दक्षिण आशिया (HNSA) :** होमनेट दक्षिण आशिया (HNSA) हे आठ देशांमधल्या घरगुती कामगारांच्या संघटनांचे प्रादेशिक नेटवर्क आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका यांचा त्यात समावेश होतो. HNSA ची स्थापना २००० साली झाली. दक्षिण आशियातील घरगुती कामगारांचे हे पहिले आणि एकमेव नेटवर्क आहे. घरगुती कामगार आणि त्यांच्या प्रतिनिधी संघटनांमध्ये विविध उपक्रमांद्वारे प्रादेशिक एकता निर्माण करणे, सरकारी कार्यक्रमांमध्ये (घरगुती कामगारांच्या समावेशासह) कामगारांचे हक्क सुनिश्चित करणे, राष्ट्रीय आकडेवारीत घरगुती कामगारांचे संख्याबळ (दृश्यमानता) निश्चित करणे त्यासाठी संबंधित धोरणांची वकिली करणे, घरगुती कामगारांचा सामूहिक आवाज मजबूत करणे, त्यांच्यासाठी चांगल्या आर्थिक संधी निर्माण करणे, त्यांना सामाजिक सुरक्षा मिळवून देणे, तसेच तळागाळातल्या संघटनांच्या क्षमतेचा विकास घडवणे हे HNSA चे ध्येय आहे. स्थापनेनंतरच्या वर्षांमध्ये, HNSA हे दक्षिण आशियातल्या घरगुती कामगारांचा अग्रगण्य आवाज म्हणून उदयास आले आहे. सदस्य देशात HNSA चे उपक्रम महिला आणि घरगुती कामगारांना सशक्त बनवतात. त्यांचे जीवन आणि उपजीविका सुधारण्यास मदत करतात.

**४. नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडिया (NASVI) :** नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडिया ही देशभरातील हजारो पथविक्रेत्यांची उपजीविका आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी संघर्ष करणारी राष्ट्रीय संस्था आहे. भारतात व्हेंडर्सचे नेटवर्क म्हणून १९९८ साली प्रारंभ झाल्यानंतर, NASVI ची नोंदणी १८६० च्या सोसायटी नोंदणी कायद्याअंतर्गत २००३ साली झाली. संघटनेचा प्रमुख उद्देश भारतातील पथविक्रेत्यांच्या संघटनांना एकत्र आणणे हा होता. जुने कायदे, बदलती धोरणे आणि सत्तेच्या विक्षिप्त दृष्टिकोनामुळे, देशातले सुमारे १० दशलक्ष (एक कोटी ) विक्रेते संकटात सापडले. या सर्वांच्या उपजीविके च्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी, आवश्यक असलेल्या समग्र बदलांसाठी आणि एकत्रितपणे संघर्ष करण्यासाठी, NASVI ची स्थापना झाली. NASVI हा पथविक्रेता संघटनांचा राष्ट्रीय महासंघ आहे. समुदाय आधारित संघटना (CBOs), गैर-सरकारी संघटना (NGOs) आणि व्यावसायिक यांचे संघटनेशी जवळचे नाते आहे. देशात पथविक्रेत्यांचे सशक्तीकरण आणि विकासासाठी काम करणाऱ्या ट्रेड युनियन (TUs), समुदाय आधारित संघटना (CBOs), गैर सरकारी संस्था (NGO), वकील, शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासाठी NASVI चे व्यासपीठ खुले आहे. NASVI चे आंध्र प्रदेश, आसाम, जम्मू आणि काश्मीर, बिहार, दिल्ली, गुजरात, झारखंड, केरळ, मणिपूर, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, मध्य प्रदेश, पंजाब, मेघालय, कर्नाटक, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, गोवा, पाँडिचेरी आणि छत्तीसगड या २५ राज्यांतल्या ८८८ **संस्थांमधे NASVI चे सध्या ५,२८,६४५ सदस्य आहेत.**

**५. सामाजिक जागरूकता आणि ऐच्छिक शिक्षण (SAVE) :** सामाजिक जागरूकता आणि ऐच्छिक शिक्षण या प्रमुख उद्देशांसाठी कार्यरत असलेली (SAVE) ही संस्था ना नफा तत्वावर चालणारी सामाजिक पुनर्रचना संस्था आहे. श्री ए. अलोयसियस यांनी १९९३ साली संस्थेची स्थापना केली. कापड आणि वस्त्रोद्योगाच्या मूल्य शृंखलेमध्ये संघटनेचे अस्तित्व आणि स्वातंत्र्य बळकट केल्यानंतर, SAVE ने बालमजुरीचे उच्चाटन करण्यावर लक्ष केंद्रित केले. महिला हक्क संरक्षणासह, श्रमिक मानकांना आणि रोजगार संबंधांना नैतिक तसेच सक्रिय प्रोत्साहन देण्याचे काम (SAVE) ने चालवले आहे. ही संस्था कामगारांना कामाच्या ठिकाणी प्रशिक्षण देते व उत्पादन प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत करते. न्याय्य श्रमिक पध्दतींसाठी MSI-TN (मल्टि स्टेकहोल्डर्स तामिळनाडू)शी सामाईक ध्येयांची चर्चा, प्रोत्साहन आणि अंमलबजावणीसाठी मुक्त संवाद, मुख्य जोखीमधारकांमधील चर्चा, व्यवसायासह, संस्थात्मक अंतरासाठी संस्थेतर्फे प्रोत्साहन दिले जाते.

**६. स्वयंरोजगार महिला संघटना (SEWA) :** SEWA ही गरीब, स्वयंरोजगार मिळवणाऱ्या महिला कामगारांची संघटना आहे. १९७२ मध्ये नोंदणीकृत झालेली ती एक ट्रेड युनियन आहे. स्वतःच्या श्रमातून अथवा छोट्या व्यवसायातून ज्या स्त्रिया उदरनिर्वाह करतात, त्यांना संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे किंवा नियमित पगारदारांप्रमाणे रोजगार मिळत नाही. कल्याणकारी लाभांपासूनही त्या वंचितच रहातात. भारतातील ९४ % पेक्षा अधिक महिला कामगार असंघटित क्षेत्रात आहेत. आपल्या देशाचे हे असुरक्षित कामगारांचे मनुष्यबळ आहे. पूर्ण रोजगारासाठी महिला कामगारांना संघटित करणे हा SEWA चा मुख्य उद्देश आहे. पूर्ण रोजगार म्हणजे असा रोजगार, ज्यायोगे कामगारांना कामाची सुरक्षा, उत्पन्न सुरक्षा, अन्न सुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा (किमान आरोग्यसेवा, बालसंगोपन आणि निवाऱ्यासह ) मिळायला हवी. प्रत्येक कुटुंबाला पूर्ण रोजगार मिळावा यासाठी SEWA महिलांकरिता स्वावलंबनाच्या शिक्षणासह विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करते. बऱ्याचशा महिला अबोल असतात, त्यांना स्वयं रोजगारासाठी प्रवृत्त करणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. आर्थिक, वैयक्तिक आणि सामूहिकरित्या महिला स्वायत्त आणि स्वावलंबी असाव्यात, यासाठी SEWA तर्फे अनेक उपक्रम राबवले जातात.

**७. राष्ट्रीय घरगुती कामगार संघ NADW :** नॅशनल अलायन्स फॉर डोमेस्टिक वर्कर्स (NADW) हे भारतभरातील घरगुती कामगारांच्या समूहांचे नेटवर्क आणि ट्रेड युनियन आहे. NADW मुख्यत्वे घरगुती कामगारांच्या न्याय्य हक्कांचे समर्थन करते. कामाच्या ठिकाणचे शोषण, गैरवर्तन, हिंसा आणि छळ यावर मात करणारे नेतृत्व निर्माण व्हावे यासाठी NADW वचनबद्ध आहे. भारतात 'नॅशनल अलायन्स फॉर डोमेस्टिक वर्कर्स' चे सदस्य आपल्या आत्म सन्मानासाठी सामूहिकपणे लढा देण्यास कायम सज्ज असतात. भारतातल्या घरगुती कामगारांना संघटित करण्यासाठी NADW चे कार्यकर्ते तत्पर आहेत. गरीब मजूर, कामगार, शेतकरी, दलित, महिला, अल्पसंख्याक आणि आदिवासींचे राजकीय हक्क नाकारले गेल्याची NADW ला जाणीव आहे. भारतात आणि जागतिक स्तरावर धर्मनिरपेक्ष आणि शांतताप्रिय चळवळीचे नेटवर्क तयार करण्यास NADW वचनबद्ध आहे.

## १८. नॅशनल अलायंस फॉर सोशल सिक्युरिटी (NASS) आणि त्याचे पूर्वीचे कार्य

दिल्लीत २०१२ साली एक राष्ट्रीय परिषद आणि जाहीर सभा झाली. या सभेचा पाठपुरावा म्हणून असंघटित कामगारांच्या मागण्यांचे निवेदन कामगार मंत्र्यांना सादर करण्यात आले. संस्थेत १२०० पेक्षा अधिक अनौपचारिक कामगार नेत्यांचा समावेश आहे. असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षा हक्कांवर ते वेळोवेळी प्रकाश टाकत असतात.

दिल्लीत ४ डिसेंबर २०१४ रोजी आयोजित केलेल्या २ दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेत, अनौपचारिक क्षेत्रातील २०० हून अधिक नेते, राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ, तरुण व्यावसायिक, उद्योजक आणि इतर मान्यवर उपस्थित होते. भविष्यातल्या सामाजिक सुरक्षा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या प्रक्रियेसाठी परिषदेत आराखडा सादर केला गेला. या समस्येला निर्धाराने सामोरे जाण्यासाठी कामगार मंत्र्यांचे पुरेसे लक्ष वेधण्यात आले.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने NASS च्या प्रयत्नांमुळे कल्याणकारी मंडळातील अनौपचारिक कामगारांच्या प्रतिनिधित्वासाठी अनुकूल निर्णय दिला.

NASS च्या नियमित पाठपुराव्याचा परिणाम म्हणून एप्रिल २०१२ मध्ये बिहार सरकारने असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा UWSSA २००८ लागू करण्यासाठी, "बिहार शताब्दी असंगठित कार्यक्षेत्र कामगार व शिल्पकार सुरक्षा योजना २०११" नावाची एक नवी सामाजिक सुरक्षा योजना, एप्रिल 2012 मध्ये सुरू केली.

गुजरात राज्य सरकारने बऱ्याच पाठपुराव्यानंतर असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन केले. अलीकडेच त्याचे नियम तयार करण्यात आले आहेत.

सामाजिक सुरक्षिततेच्या मागणी मोहिमेवर NASS ने ७ राज्यांमध्ये १० लाख स्वाक्षऱ्या गोळा केल्या. या स्वाक्षऱ्या आणि मागण्यांची संबंधित खासदार आणि आमदारांना गांभिर्याने जाणीव करून देण्यात आली.

NASS च्या सदस्य संघटनांतर्फे विविध राज्यांमधून COVID-19 सहाय्य निधी संकलित करण्यात आला.

संशोधकांच्या मदतीने, विविध राज्यातील अनौपचारिक कामगारांच्या दुर्दशांचे दस्तऐवजीकरण करण्यासह, अशा प्रसंगांचा सामना करण्यासाठी यंत्रणा कशी उभारता येईल, याचा खालील मुद्द्यांवर राज्यनिहाय अभ्यास करण्यात आला: रोख रक्कम, इतर स्वरुपात मदत, युनियनच्या मागण्या आणि सततची आव्हाने. NASS सदस्यांनी यावेळी ८० प्रकरणांच्या कथा सादर केल्या.

COVID-19 महासाथीच्या काळात, कामगारांची व्यक्तिगत सुरक्षा, आरोग्य आणि अन्न सुरक्षा यांची चोख व्यवस्था व्हावी, यासाठी NASS तर्फे मागण्यांची एक सनद तयार करण्यात आली. त्याच्या जोडीला अनौपचारिक क्षेत्रातल्या कामगारांचे हक्क स्पष्टपणे नमूद करण्याची सूचनाही तयार करण्यात आली.

सामाजिक सुरक्षा संहितेच्या परिणामांवर एक वेबिनार (इंटरनेटच्या माध्यमातून परिसंवाद) आयोजित करण्यात आला. त्याचे संचालन होमनेट दक्षिण आशियाच्या आंतरराष्ट्रीय समन्वयक जान्हवी दवे यांनी केले. या वेबिनारचे वक्ते प्राध्यापक बाबू मॅथ्यू होते. NLSIU च्या स्थापनेपासूनच प्राध्यापक मॅथ्यू त्याचे सदस्य आहेत.

सामाजिक सुरक्षा संहितेवर कर्नाटक विद्यापीठाचे प्राध्यापक शरथ बाबू यांच्यासोबत वेबिनार (इंटरनेटच्या माध्यमातून परिसंवाद) आयोजित करण्यात आला. सामाजिक सुरक्षा संहिता मसुद्यावरील चर्चेचा पाठपुरावा करण्यासाठी विद्यमान स्थितीवर आधारित स्थिती अहवाल (स्टेट्स रिपोर्ट) तयार करण्यात आला.

---